## महत्वाचे...

### चाकण येथे वाहतूक पोलिसाला धडक देत स्कॉर्पिओ चालक पसार

**चाकण । प्रतिनिधी**

आळंदी-चाकण रोडवरील आळंदी फाटा सिग्नल येथे शनिवारी (दि. ३० ऑगस्ट) दुपारी वाहतूक नियमनाचे काम करणाऱ्या महिला पोलिस कर्मचाऱ्यास स्कॉर्पिओ चालकाने अरेरावी करत गाडी थांबवण्यास नकार दिला. गाडीची तपासणी केली असता ६२ हजार रुपयांचा दंड बाकी असल्याचे आढळले. गाडी थांबवण्याची सूचना दिल्यावर चालकाने शिवीगाळ करून माझ्याकडे परवाना नाही, काय करायचे ते करा; असे म्हणत सरकारी कामात अडथळा निर्माण केला. यावेळी गाडी बाजूला करण्याच्या प्रयत्नात पोलिस कर्मचाऱ्याच्या हाताला दुखापत झाली. त्यानंतर चालक गाडी घेऊन चाकणकडे पसार झाला. एमएच-१४-डीए-५२५२ या क्रमांकाच्या स्कॉर्पिओ गाडी चालकाविरुद्ध चाकण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२१(१), १३२, १८४, १३४, १७७ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला आहे.

### चिखलीत तरुणावर दगडफेक करून खुनाचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

मोरेवस्ती येथील शिवकृपा हौसिंग सोसायटी परिसरात रविवारी संध्याकाळी ४ वाजता मंदिराजवळ बसलेल्या १९ वर्षीय तरुणावर तिघांनी दगडफेक करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. तरुण ऑनलाईन पेमेंट करत असताना, ïïï;इथे बसायचं नाही, आम्ही इथले भाई आहोत; असे म्हणत आरोपींनी त्याला जबरदस्ती उठवण्याचा प्रयत्न केला. विरोध केल्याने संतापलेल्या आरोपींनी शिवीगाळ करत त्याच्यावर हल्ला चढवला. त्यातील दोघांनी दगड डोक्यावर व पाठीवर मारल्याने गंभीर दुखापत झाली तर तिसऱ्याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी आजूबाजूला जमलेल्या लोकांना;कोणी मध्ये पडले तर ठार मारू; अशी धमकी देत परिसरात दहशत पसरवली. या प्रकरणी हरिष त्रिपाठी (१९), एका अल्पवयीन मुलासह तिसऱ्या अज्ञात इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी एकाचा शोध सुरू असून, पुढील तपास चिखली पोलिस करत आहेत.

### येरवड्यात दहशतवाद; पोलिसांनाही मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास टोळक्याने एका तरुणाचा मार्ग अडवून मारहाण केली. दुचाकी भरधाव वेगात चालवत त्याचा जीव धोक्यात आणत चांदीची चैन व मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. या प्रकारात पोलिस अंमलदारांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांनाही धक्काबुक्की करत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकरणी ज्ञानेश्वर नटकले (२६), राहुल साळवे (२३), रोहित डोंगरे (२७), सिध्दी कांबळे (२४) आणि हर्षल भोसले (२५) यांच्यावर येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षल भोसलेला पोलिसांनी अटक केली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

# गुरुदेव आर. डी. रानडे स्थापीत अकॅडमीचा शताब्दी सोहळा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे येथील डेक्कन कॉलेज (अभिमत विद्यापीठ) मध्ये आधुनिक भारतातील नामवंततत्त्वज्ञ गुरुदेव रामचंद्र दत्तात्रेय रानडे (जन्म १८८६) यांनी स्थापन केलेल्या 'अकॅडमी ऑफ कम्पॅरिटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन' च्या शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ही संस्था १९२४ साली पुण्यात स्थापन झाली असून १९५१ मध्ये बेळगाव, कर्नाटक येथे स्थलांतरित झाली. हा शताब्दी सोहळा अकॅडमी व डेक्कन कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला. गुरुदेव रानडे हे डेक्कन कॉलेजचे माजी विद्यार्थी तसेच फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्राध्यापक होते. त्यांनी १९०३ ते १९०९ या काळात डेक्कन कॉलेजमधून बी.ए. आणि एम.ए. पदव्या संपादन केल्या. पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज व सांगली येथील वेलिंग्टन कॉलेज येथे काही काळ अध्यापन कार्य करून, १९२७ मध्ये ते अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञान विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून रुजू झाले आणि १९४७ पर्यंत तेथे कार्यरत होते. अलाहाबाद विद्यापीठातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील निंबाळ येथे आश्रम स्थापन केला व १९५७ मध्ये त्यांचे निधन झाले.




पूर्व आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान व धर्म यांच्या तुलनात्मक अभ्यासाला चालना देण्यासाठी प्रा. रानडे यांनी 'अकॅडमी ऑफ कम्पॅरिटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन' ची स्थापना केली. स्वागतपर भाषणात डेक्कन कॉलेजचे प्रभारी कुलगुरू प्रा. प्रसाद जोशी यांनी गुरुदेवांचा डेक्कन कॉलेजशी असलेला निकटचा संबंध सांगितला आणि डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थिगृहातील त्यांनी वापरलेली खोली त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष स्मृतीगृह म्हणून जपली जात असल्याचे नमूद केले. आपल्या भाषणात अ‍ॅड. श्री. मारुती झिरली, मानद सचिव, अकॅडमी ऑफ कम्पॅरिटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन, यांनी गुरुदेव रानडे यांनी तत्त्वज्ञान आणि धर्माच्या अभ्यासात अंगीकारलेली व प्रचारित केलेली तुलनात्मक आणि चिकित्सक दृष्टी पुढे नेण्यासाठी अकॅडमीमार्फत आयोजित केले जाणारे परिसंवाद, विशेष व्याख्याने व इतर कार्यक्रम यांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी हेही सांगितले की प्रा. रानडे यांचे सर्व लेखन लवकरच 'संपूर्ण ग्रंथावली' म्हणून २४ खंडांत प्रकाशित होणार आहे. या प्रसंगी त्यांनी डेक्कन कॉलेजला गुरुदेव रानडे यांचे भव्य छायाचित्र भेट दिले.

प्रा. गुरुदेव रानडे यांचे जीवनकार्य व वारसा या विषयावरील आपल्या व्याख्यानात प्रा. अभ्यंकर यांनी अनेक तपशील दिले. शालेय जीवनातच उमदीच्या भाऊसाहेब महाराजांनी गुरुदेवांना अध्यात्मिक जीवनाची दीक्षा दिली होती व नंतर तत्त्वज्ञानाच्या अभ्यासक्रमात त्यांनी अध्यात्मिक दृष्टिकोनाचा अंगीकार कसा केला, याची त्यांनी माहिती दिली. त्याचबरोबर गुरुदेवांनी केवळ प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर टीबीच्या व्याधीवर मात कशी केली तसेच प्राचार्य बैन यांसारख्या शिक्षकांनी त्यांना थियोसॉफीमध्ये सामील करून घेण्याचे केलेले प्रयत्न त्यांनी कसे नाकारले, याचेही त्यांनी वर्णन केले. गुरुदेवांनी प्राचीन व मध्ययुगीन भारतीय विचारधारांमधून प्रेरित होऊन स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण अध्यात्मिक विचार विकसित केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. के. पद्दय्या, मानद प्राध्यापक व माजी संचालक, डेक्कन कॉलेज (अभिमत विद्यापीठ), यांनी गुरुदेव रानडे यांची 'रॅशनल मिस्टिसिझम' (सर्वव्यापी, निराकार व निरनामी दैवी शक्तीशी एकरूप होणे आणि त्या ईश्वरानुभूतीचा उपयोग समाजकल्याणासाठी करणे) ही संकल्पना तसेच समाज व त्यांच्या विचारप्रवाहांचा अभ्यास करण्यासाठी तुलनात्मक दृष्टिकोनावर दिलेला भर, हे आजच्या काळात (जेव्हा सांस्कृतिक, धार्मिक, जातीय आणि जीवनातील इतर क्षेत्रांत दुरावे व मतभेद वाढत आहेत) अतिशय महत्त्वाचे ठरतात, असे प्रतिपादन केले.



# शुक्रवार पेठेत अवतरली 'वारी'ची भक्तिमय छटा, पुणेकर मंत्रमुग्ध

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात गणेशोत्सवाचा उत्साह उफाळून आला असून, सार्वजनिक मंडळांकडून यंदा विविध मंदिरांच्या प्रतिकृतींसह सामाजिक विषयांवर आधारित देखावे सादर केले जात आहेत. या देखाव्यांना पाहण्यासाठी पुणेकरांसह इतर ठिकाणाहून आलेले भाविक मोठ्या संख्येनं गर्दी करत आहेत.

याच पार्श्वभूमीवर, पुण्यातील शुक्रवार पेठेतील संतोष मोतीलाल परदेशी परिवारानं साकारलेला देखावा यंदा विशेष आकर्षणाचं केंद्र ठरत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त 'वारी' या वारकरी संप्रदायाच्या अखंड परंपरेवर आधारित हा देखावा सादर करण्यात आला आहे. या देखाव्यातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला सुरेख उजाळा देण्यात आला आहे.

वारीच्या माध्यमातून भक्ती, परंपरा आणि सामाजिक ऐक्याचं दर्शन घडवत, या देखाव्यानं प्रेक्षकांचं विशेष लक्ष वेधलं आहे. पारंपरिक वेशभूषा, भजन-कीर्तन, टाळ-मृदुंगाचा गजर यांचा सुरेख संगम यामध्ये पहायला मिळतो. पंढरपूर वारीतून प्रकट होणारा भक्तिभाव, संतपरंपरेचं महत्त्व आणि सामूहिक ऐक्य यांचे दर्शन घडवणारा हा देखावा प्रेक्षकांच्या मनात नव्यानं अध्यात्माची जागृती करत आहे. संस्कृती आणि अध्यात्म यांचे सुरेख मिश्रण या माध्यमातून साकारण्यात आले असून, हे दृष्य अनुभवण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. परदेशी परिवारानं या देखाव्यासाठी घेतलेली मेहनत खऱ्या अर्थानं सार्थक ठरली आहे, असं नागरिकांनी समाधानानं सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी रुजवलेल्या वारकरी परंपरेचा संदेश अधिकाधिक समाजात पोहोचावा आणि दृढ व्हावा, अशी अपेक्षा देखील यावेळी व्यक्त करण्यात आली. हा देखावा केवळ कलात्मक सादरीकरण नसून, तो महाराष्ट्राच्या संतपरंपरेची, भक्तीपरंपरेची आणि सामाजिक ऐक्याची शिकवण देणारा एक प्रभावी अध्यात्मिक अनुभव ठरत आहे.

# आयआयएमसाठी मोशीच्या माळावर ७० एकर जागा

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे. मोशीमध्ये तब्बल ७० एकर जागेवर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) म्हणजेच भारतीय व्यवस्थापन संस्था स्थापन होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोशी परिसरात या आयआयएम कॅम्पससाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. १६ एकरावर न्यायालय, ४० एकरावर अभियांत्रिकी महाविद्यालय, २०० एकरवर आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, १०० एकरवर सुविधा केंद्र, तब्बल ८०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, जगातील सर्वात मोठा छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा आदी प्रकल्पांमुळे मोशीचा माळरान फुलणार आहे. आता त्यात आयआयएमची भर पडली आहे.

सध्या देशभरात एकूण २१ भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) कार्यरत आहेत. यामध्ये महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, जिथे मुंबई आणि नागपूर येथे आयआयएमच्या शाखा आहेत. आता या यादीत आणखी भर घालत पिंपरी-चिंचवडमध्येही आयआयएमची नवी शाखा सुरू होणार आहे. आयआयएम नागपूरच्या या शाखेसाठी गेले वर्षभर सातत्याने पाठपुरावा सुरू होता आणि अखेर त्याला यश मिळाले.

**आयआयएम म्हणजे काय?**

**भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) या देशातील सर्वोच्च व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. येथे एमबीए आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासोबतच संशोधन, उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि उद्योजकतेला चालना दिली जाते. जागतिक स्तरावर सक्षम व्यवस्थापक आणि उद्योगनेते घडवणे हेच या संस्थांचे प्रमुख उद्दिष्ट मानले जाते.**

# एनसीएलच्या पाषाण कॅम्पसमधून चंदन चोरी; दोन अटकेत, दोन फरार

**पुणे । प्रतिनिधी**

पाषाण येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) कॅम्पसमध्ये गुरुवारी पहाटे घडलेल्या धाडसी चंदन चोरीप्रकरणी दोन जणांना रंगेहात पकडण्यात सुरक्षा रक्षकांना यश आले आहे. तब्बल ४६ हजार रुपयांच्या किमतीची सात चंदनाची झाडे तोडून नेण्याच्या प्रयत्नात चार चोरट्यांनी धाड टाकली होती, मात्र सुरक्षा रक्षकांच्या दक्षतेमुळे दोघे जेरबंद झाले. इतर दोघे मात्र कारसह पसार झाले असून त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

चतुश्रृंगी पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अमोल धस यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे बाबू लोखंडे (५६, रा. केडगाव, ता. दौंड) व सुरेश पटले (२८, रा. खुटबाव, ता. दौंड) अशी आहेत. चोरीच्या प्रयत्नादरम्यान झालेल्या झटापटीत दोघांनाही किरकोळ दुखापत झाली आहे.

घटना पहाटे साडेतीनच्या सुमारास घडली. चार चोरटे एनसीएलच्या कॅम्पसच्या मागील बाजूस असलेल्या कंपाऊंड भिंतीवरून आत शिरले. त्यांनी करवतीच्या ब्लेडच्या साहाय्याने चंदनाची झाडे तोडण्यास सुरुवात केली. त्या वेळी नियमित गस्त घालणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या नजरेत ही हालचाल आली. तात्काळ त्यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती देत घटनास्थळाकडे धाव घेतली.

दरम्यान, आपली हालचाल उघडकीस आल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कंपाऊंड भिंत ओलांडून बाहेर जाण्याचा प्रयत्न करताना सुरक्षा रक्षकांचा प्रतिकार केला. लोखंडे व पटले यांनी रक्षकांवर हल्ला करण्याचाही प्रयत्न केला. मात्र रक्षकांनी लाठ्यांचा वापर करून त्यांना काबूत आणले व पोलिसांच्या स्वाधीन केले. उर्वरित दोघे मात्र चंदनाच्या ओंडक्यांसह कारमध्ये बसून पाषाणच्या दिशेने पसार झाले. त्यांचा शोध सुरू असून, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

### बांधकामस्थळी मजुराचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील पर्वती दर्शन परिसरातील ओंकार असोसिएट्स या एसआरए प्रकल्पातील बांधकाम साईटवर सुरक्षेच्या साधनसामुग्रीचा अभाव ठरून एका मजुराचा मृत्यू झाला. शनिवारी (दि.३० ऑगस्ट) सायंकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. गेंदमानी रघुराई साकेत (२९, रा. कुचवाही, ता. सिहावाल, जि. सिधी, मध्यप्रदेश) हा मजूर काम करत असताना तिसऱ्या मजल्यावरील लिफ्ट डक्टजवळ तोल जाऊन खाली पडला. जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच तो मृत घोषित केला. सुरक्षेसाठी हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, जाळी आदी साधनसामग्री न पुरवल्याचा आरोप बांधकामदार व सेफ्टी ऑफिसरवर असून, पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाची जागतिक दखल

## इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने सन्मान

**मुंबई । प्रतिनिधी**

शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिकस्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला. या अभियानाचे मार्गदर्शक आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'चे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष श्री. हेनरी आर (युरोप), प्रमुख श्री. पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष श्री. संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे.



महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची दखल जागतिकस्तरावर घेण्यात आल्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे छोटेखानी बैठकीत कौतुक केले. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांची उपस्थिती होती.

'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. या संस्थेने महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभाग आंतरराष्ट्रीय विक्रम असल्याची घोषणा केली व मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला. यावेळी युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, नेपाळ आणि भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

यामध्ये तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांसाठी महावितरणला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थांनी नुकतेच गौरविले आहे. आता या अभियानाच्या लोकसहभागावर आंतरराष्ट्रीय विक्रमाचा शिक्कामोर्तब झाला आहे.

### चिखली येथे मोफत महाआरोग्य शिबिर!

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे आज नागरी आरोग्य पोषण दिनानिमित्त चिखली येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल रुखमाई मंदिर, अष्टविनायक चौक, मोरे वस्ती, चिखली येथे झालेल्या या आरोग्य शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभागी होऊन विविध तपासण्या व उपचारांचा लाभ घेतला. या शिबिराचे उद्घाटन महानगरपालिकेच्या सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे यांच्या हस्ते करण्यात आले. नोडल ऑफिसर विद्याधर फल्ले (यमुनानगर हॉस्पीटल), पीएचएन शैलेश मुळे तसेच झोनल मेडिकल ऑफिसर रवींद्र मनपे (यमुनानगर हॉस्पीटल) उपस्थित होते. शिबिरात नागरिकांसाठी वजन, उंची, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, नियमित लसीकरण, छातीचा द-ठअध, धुंकी तपासणी, गरोदर मातांची तपासणी, आभा व आयुष्मान कार्ड नोंदणी या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.